# जय त्रिमुर्ती को. ऑप. हौ. सोसायटी लि., कळवा, ठाणे

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

संस्थेची दिनांक ३१ मार्च २०२६ अखेर पुर्ण होणाऱ्या आर्थिक वर्षाची ४७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ०६ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ठीक ०३.०० वाजता, श्री स्वामी समर्थ मंगल कार्यालय (हॉल), श्री स्वामी समर्थ मठ, दत्तवाडी, मुंबई पुणे रोड, खारीगांव, कळवा (प.), ठाणे - ४०० ६०५ येथे घेण्यात येणार आहे. आपणा सर्वांना कळविण्यात येते की, आपण सभेस वेळेवर उपस्थित राहून सभेच्या कामकाजात सहकार्य करावे, ही विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

१) दिनांक २१/०९/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.
२) कार्यकारी मंडळाने सादर केलेले सन २०२५-२०२६ या आर्थिक वर्षाच्या कामकाजाचा ४७ वा वार्षिक अहवाल स्विकृत करणे.
३) वैधानिक हिशोब तपासणीस यांनी प्रमाणीत केलेले आर्थिक वर्ष सन २०२५-२०२६ चे ताळेबंद पत्रक व उत्पन्न खर्च पत्रक मंजुर करणे व त्यांनी सादर केलेल्या हिशोब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
४) सन् २०२५ -२०२६ मधील अंदाज पत्रका पेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजुरी देणे व सन् २०२६ - २०२७ या वर्षाचे उत्पन्न व खर्चाच्या अंदाज पत्रकास मान्यता देणे.
५) सन् २०२६ - २०२७ या आर्थिक वर्षाकरीता वैधानिक हिशोब तपासनीसाची नेमणूक करणे व त्यांचा शासकीय मेहनताना ठरविणे.
६) सन् २०२५ - २०२६ लेखा परीक्षणाच्या दोष-दुरुस्ती अहवालास मान्यता देणे.
७) सन् २०२५-२०२६ मधील कार्यकारी मंडळाने शिफारस केलेल्या सदनिका व व्यापारी गाळे हस्तांतरण व नवीन सभासदांच्या सभासदस्यत्वास मंजुरी देणे.
८) इन्कमवरील टीडीएस (जुना)रूपये १,२६,५६५/- (TDS On Income) व देय टीडीएस (TDS Payable) रुपये २८००/- याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
९) रुपये २५०/- चे भागप्रमाणपत्र रद्द करण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.
१०) पुर्नविकास संबंधी थोडक्यात चर्चा करणे.
११) मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

सचिव

**सौ. विद्या नंदकुमार राऊत**

(जय त्रिमुर्ती को. ऑ. हौ. सो. लि. कळवा)

दिनांक : २२/०८/२०२६

टिप :- १) सभेसाठी आवश्यक अशा गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास तीच सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी त्याच विषयांसाठी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्या सभेला गणसंख्या पूर्ततेचे बंधन राहणार नाही. तसेच त्या सभेत घेतलेले सर्व निर्णय सभासदास बंधनकारक राहतील.

२) सभासदांचे काही प्रश्न किंवा सुचना असल्यास त्यांनी संस्थेच्या कार्यालयीन वेळेत दि. ३०/०८/२०२६ पर्यंत लेखी कळवावे.



Scanned with OKEN Scanner